# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date – 08 October 2023
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक – ०८ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०

****

- भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिन सोहळ्यात नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण.
- जपानमध्ये इंडिया मेला' या कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण.
- कोल्हापुरचा शाही दसरा उत्सव 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित.
- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचं भारतासमोर २०० धावांचं आव्हान.

आणि

- आशियाई क्रीडा स्पर्धांचा समारोप.

****

भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा आज उत्तर प्रदेशात प्रयागराजच्या बमरौली तळावर झाला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी संचलनाचं निरीक्षण केलं. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्यासह अनेक मान्यवरही यावेळी उपस्थित होते. यावेळी एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण केलं. जुना बोधचिन्हांकीत ध्वज सन्मानपूर्वक उतरवून हवाई दलप्रमुखांकडे सुपूर्द केला गेला. आता हा जुना बोधचिन्हांकीत ध्वज हवाईदलाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवला जाणार आहे. यंदाची हवाई दलाची संकल्पना "हवाई ताकद – सीमापार" अशी आहे.

मुंबईत झालेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हवाई दल केवळ आकाशातून संरक्षण करत नाही तर देशाच्या कोणत्याही भागाला नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसला तर तात्काळ धावून जातं, असं एअर व्हाईस मार्शल रजत मोहन यांनी सांगितलं.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था- इस्रोनं गगनयानच्या चाचणीची तयारी सुरू केली आहे. २०२४ मध्ये अंतराळात मानवरहित यान तसंच मानवांना अंतराळात पाठवण्याच्या उद्देशानं यानातील व्यवस्थेची कार्यक्षमता तपासणं, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. चाचणीत बाह्य अवकाश कक्षेत यानाला वायुमंडलातून पुन्हा पृथ्वीवर परत आणून बंगालच्या उपसागरात उतरवलं जाणार आहे. भारतीय नौदलाच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी सराव सुरू केला असून या चाचणीच्या यशामुळं पहिल्या मानवरहित गगनयान मोहिमेचा टप्पा निश्चित होईल आणि शेवटी पृथ्वीच्या कमी कक्षेत बाह्य अवकाशात मानवयुक्त मोहिमेचा मार्ग निश्चित होण्यास मदत होणार आहे. यासाठी निवडलेले चार अंतराळवीर बंगळुरुच्या अंतराळ प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत.

****

इंडिया मेला’च्या निमित्ताने भारत आणि जपान या दोन्ही देशांमधील सौहार्द, मैत्रीभाव घट्ट होऊन दोन्ही देश एकत्रीतपणे प्रगतीची नवी शिखरे सर करतील, असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. जपान मधल्या कोबे शहरात भारत-जपान यांच्यातील कला आणि खाद्य संस्कृतीला चालना देण्यासाठी आयोजित ‘इंडिया मेला’ या कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभात ते बोलत होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे जपानमध्ये सादरीकरण झाल्याचा सांस्कृतिक मंत्री म्हणून मनापासून आनंद असल्याचं मुनगंटीवार यांनी सांगितलं. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना जपानाने साथ दिल्याचा उल्लेख मुनगंटीवार यांनी यावेळी केला.

****

पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी हमासनं केलेल्या हल्ल्याचा निषेध करत इस्रायलला पाठिंबा व्यक्त केला आहे. इस्रायलच्या भारतातल्या दूतावासानंही या पाठिंब्याबद्दल भारताचे आभार मानले आहेत. या हल्ल्यानंतर पॅलेस्टीनमधल्या भारतीय प्रतिनिधी

कार्यालयानं रामल्ला इथल्या भारतीयांना आपत्कालीन स्थितीत थेट संपर्क करावा असं आवाहन केलं आहे.

पॅलेस्टिनी दहशतवादी संघटना हमासनं केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात इस्रायलच्या संरक्षण दलांनी स्वॉर्ड्स ऑफ आयर्न ही मोहीम सुरु केली आहे. या मोहीमेअंतर्गत इस्रायलनं गाझा पट्ट्यातल्या हमासच्या ताब्यातल्या १७ लष्करी छावण्या आणि चार केंद्रांवर हल्ले केले, यात २३० पेक्षा अधिक जण ठार झाल्याचं वृत्त आहे. त्याआधी हमासनं इस्रायलवर आधी रॉकेटचा मारा करत आणि नंतर गाझा पट्टीतून इस्रायलच्या शहरांमध्ये घुसखोरी करत केलेल्या हल्ल्यात तीनशेहून अधिक लोक ठार तर दीड हजारापेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत

****

कोल्हापुरचा शाही दसरा उत्सव राज्य शासनानं 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केला आहे. १५ ते २४ ऑक्टोबर दरम्यान असलेल्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

****

शिवसेना भाजपने त्यांच्या जाहीरनाम्यात टोलमुक्तीचे आश्वासन दिले होते, त्याचे काय झाले, असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विचारला आहे. टोलदरवाढी विरोधात मनसेचे ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव हे गेल्या चार दिवसांपासून ठाण्याच्या वेशीवरील मुलुंड टोलनाका इथं उपोषणाला बसले आहेत. राज ठाकरे यांनी आज आंदोलनस्थळी जाऊन त्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी ठाणे इथं शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत बोलत होते.

टोलवाढी संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून त्यानंतरही सकारात्मक निर्णय झाला नाहीतर मात्र गांधीवादी मार्गाने नव्हे तर मनसे स्टाईलने आंदोलन केले जाईल. त्याबाबतची भूमिका लवकरच जाहीर करणार आल्याचं राज ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

****

क्रिकेट

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा ऑस्ट्रेलियासोबत चेन्नई इथं सामना सुरू आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर पाहुण्या संघाचे फलंदाज अपेक्षित

कामगिरी करू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियाचा संघ पन्नासाव्या षटकांत १९९ धावांवर सर्वबाद झाला.
रवींद्र जडेजाने तीन, कुलदीप यादव आणि जसप्रीत बुमराह या दोघांनी प्रत्येकी दोन तर मोहम्मद सिराज, रविचंद्रन अश्विन आणि हार्दिक पांड्याने प्रत्येकी एक बळी घेतला.

****

चीनमध्ये हाँगचाओ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेचा समारोप होत आहे. या समारोप सोहळ्यात हॉकी संघाचे गोलकीपर पी आर श्रीजेश भारतीय पथकाचे ध्वजवाहक आहेत. या स्पर्धेत २८ सुवर्ण, ३८ रौप्य तसंच ४१ कांस्य पदक जिंकत पदकतालिकेत भारतानं चौथा क्रमांक मिळवला आहे.

****

जालना इथल्या जे.ई.एस. महाविद्यालयात “युवा संवाद” या कार्यक्रमांतर्गत” भारतीय अंतराळ संशोधन संस्था–इस्रोच्या अहमदाबाद शाखेत कार्यरत शास्त्रज्ञ श्रद्धा गोयंका अग्रवाल यांनी चंद्रयान- 3, एक उपलब्धी” या विषयावर मार्गदर्शन केलं. अपयशामुळे खचून न जाता, जिद्दीने काम करत राहिल्यास यश हमखास मिळतं, चांद्रयान हे याचं मोठं उदाहरण असल्याचं अग्रवाल यांनी सांगितलं.

****

प्रत्येक चांगल्या कामाची सुरुवात शिक्षकापासून झाल्यास गावा–गावातील विद्यार्थ्यांसह सामाजाची निश्चीतच प्रगती होईल, असं मत बीड जिल्हा परिषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंके यांनी व्यक्त केलं आहे.राष्ट्र उभारणीमध्ये मोलाची कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी रोटरी लिटरसी मिशन अंतर्गत, रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने रविवारी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार वितरण सोहळ्यात ते आज बोलत होते. यावेळी सभागृहामध्ये उभे राहून डॉ. सुधा कांकरीया यांनी लिहलेल्या **मुलगी वाचवा- स्त्रीभ्रूण हत्या थांबवा ची** सर्वांनी शपथ घेतली.

****

माजी मंत्री आदित्य ठाकरे उद्या छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यावर येत आहेत. रुग्ण संख्या, औषधांची मागणी, उपलब्ध साठा, रुग्णसुविधा आणि रिक्त पदं याबाबत ते अधिष्ठाता यांच्यासोबत चर्चा करणार असल्याची माहिती विधान परिषदेचे विरोधी

पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली. यासोबतच ते नांदेड तसंच नागपूर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांची सुद्धा पाहणी करणार आहेत.

****

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात  गेल्या २४ तासात ९७ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत तर १५ अतिगंभीर रुग्णांचा मृत्यू झाला. सध्या रुग्णालयात ७३२ रुग्ण उपचार घेत असल्याची माहिती वैद्यकिय अधिक्षक डॉ. गणेश मनुरकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

****

एसटी महामंडळाच्या शयनयान बसला पुण्याहून नांदेडकडे जाणाऱ्या बीड जिल्ह्यातल्या लिंबागणेश इथं आज सकाळी, बस चालकाचा ताबा सुटल्यानं अपघात झाला. या अपघातात ५ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

****

सिक्कीममध्ये मंगळवारी चार ऑक्टोबर पहाटे झालेल्या ढगफुटीमुळे तिस्ता नदी किनाऱ्यावरची लष्कराची छावणी वाहून गेली. यात बीड जिल्ह्यातले रहिवासी असलेले सैनिक पांडुरंग तावरे बेपत्ता झाले होते. तीन दिवसांनंतर त्यांचा पार्थिव देह सापडला. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या बीड जिल्ह्यात काकडहिरा इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****